वाचले :-

1. मा.अतिरिक्त जिल्हा शिक्षु प्रशिक्षणार्थी सल्लागार, शिक्षु प्रशिक्षण मंडळ, (प.क्षे.), मुंबई यांचेकडील पत्र क्र.शिप्रमं/सूचना/122455/13849, दि.10/11/2004.
2. जाहीर प्रकटन क्र.प्रशा/11/कावि/659/2019, दि.19/09/2019 अन्वये प्रसिध्द जाहिरात.
3. पत्र क्र.प्रशा/10/कावि/659/2019, दि.17/09/2019 चे पत्रानुसार टेबल क्र.10 कडून प्राप्त आरक्षण.
4. दि.16/12/2019 चा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.
प्रशासन विभाग
क्र.प्रशा/11/कावि/817/2019.
दि. 20/12/2019.

**विषय :- शिक्षु प्रशिक्षणार्थी अधिनियम 1961 अंतर्गत शिक्षु उमेदवारांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर नेमणूक करणेबाबत...**

**आदेश,**

वाचले क्र.1 अन्वये कळविणेत आलेनुसार शिक्षु उमेदवाराच्या 4 व्यवसायासाठी एकूण 25 जागा उपलब्ध आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शिक्षु उमेदवार अधिनियम-1961 अंतर्गत सन 2019-20 चे सत्राकरीता शिक्षु उमेदवारांची नेमणूक करण्यास वाचले क्र.2 अन्वये अर्ज मागविणेसाठी महापालिका संकेतस्थळावर जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त अर्जातील पात्र उमेदवारांची परिक्षेतील प्राप्त गुणानुक्रमानुसार तसेच वाचले क्र.3 अन्वये आरक्षणानुसार सन 2019-20 या सत्राकरीता खालील शिकाऊ उमेदवारांची आरक्षण व गुणानुक्रमानुसार नेमणूक करण्यात येत आहे.

| पदनाम | प्रशिक्षण कालावधी | अ. क्र. | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | टक्केवारी | द्यावयाचे मासिक विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| स्थापत्य अभियंता (डिप्लोमा) | 1 वर्ष | 1 | इंगळे नेहा रामचंद्र | अनु.जाती | 72.79% | रु.8,000/- |
| | | 2 | ठाकरे महेश मनिराम | अनु.जमाती | 61.64% | रु.8,000/- |
| | | 3 | थोरात ओंकार बाळासाहेब | भ.ज.(ब) | 66.30% | रु.8,000/- |
| | | 4 | अंबाडकर आशय संजय | इमाव | 64.85% | रु.8,000/- |
| | | 5 | वनंजे बाळासाहेब किशनराव | अनु.जाती (एस.ई.बी.सी.) | 68.18% | रु.8,000/- |
| | | 6 | सोनवणे हितेश दिनेश | अनु.जाती (एस.ई.बी.सी.) | 65.03% | रु.8,000/- |
| | | 7 | वनकर सागर भिमराव | अनु.जाती (ई.डब्ल्यू.एस.) | 63.26% | रु.8,000/- |
| | | 8 | म्हसाणे आकाश कैलास | अनु.जाती (खुला) | 62.97% | रु.8,000/- |

वरील शिक्षु उमेदवारांना नि:संदिग्धपणे समज देण्यात येते की, प्रस्तुतच्या आदेशान्वये करण्यात आलेली नेमणूक ही पूर्णत: प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आली असून नेमणूक कालावधीत खालील अटी व शर्ती त्यांच्यावर बंधनकारक राहतील. उमेदवारांनी सदरचा आदेश प्राप्त झालेपासून 7 दिवसांचे आत प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशासन विभागात रूजू होऊन विहीत नमुन्यातील करारनामा सादर करावा. मुदतीत रूजू न झाल्यास आपली नियुक्ती संपुष्टात येईल.

1. नेमणूकीचे पदावर रूजू होताना शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता, जातीविषयक व शाळा सोडल्याचा दाखला यांची मूळ प्रत व प्रत्येकी 2 प्रमाणित सत्यप्रती (झेरॉक्स) आणाव्यात. प्रशिक्षणार्थीने रूजू होताना नव्याने काढलेला आपल्या छायाचित्राच्या (फोटोच्या) 3 प्रती सोबत आणाव्यात. उपरोक्त कागदपत्राअभावी रूजू करून घेतले जाणार नाही.
2. प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थींना अधिनियमानुसार वर्षात 12 दिवस किरकोळ रजा व 15 दिवस वैद्यकीय रजा देय राहतील. याव्यतिरिक्त अन्य फायदे व सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.

3. प्रशिक्षण कालावधीमध्ये नियमितपणे कामावर हजर राहणे आवश्यक आहे आणि नेमून दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल. प्रशिक्षण कालावधीमध्ये विनापरवाना गैरहजर राहिल्यास 1 वर्षे पूर्ण होण्यापूर्वी प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आणला जाईल व अधिनियमानुसार तसेच संविदेनुसार योग्य ती कारवाई करण्यात येऊन दिलेले विद्यावेतन वसुल केले जाईल.
4. सदर आदेशान्वये करण्यात आलेल्या नेमणूका या पूर्णत: प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आलेल्या आहेत. प्रशिक्षणाचा विहीत कालावधी पूर्ण होताच प्रशिक्षणार्थी म्हणून केलेली नेमणूक संपुष्टात येईल. त्यामुळे उमेदवारांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हक्क सांगता येणार नाही अथवा हक्क राहणार नाही.
5. शिक्षु प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयामार्फत संविदा नोंदणी करून यापूर्वी अन्य कोठेही प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव संविदा नोंदणी न झाल्यास या कार्यालयामार्फत कोणतेही विद्यावेतन व अन्य फायदे न देता त्वरीत कार्यमुक्त केले जाईल. तसेच उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.
6. शिक्षु उमेदवारांनी मासिक विद्यावेतन त्यांचे बँक खात्यावर जमा झाल्यानंतर त्या पासबुकची छायांकित प्रत प्रशासन विभागास दरमहा सादर करावी.
7. भारत सरकार कौशल्य विकास आणि उद्यमिता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसूचना दि.25 सप्टेंबर, 2019 अन्वये शिक्षु उमेदवारांना निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

सही/-
(मनोज लोणकर)
**सहाय्यक आयुक्त, प्रशासन**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411 018.

प्रति,
सर्व संबंधित शिक्षु उमेदवार

प्रत –
1) लेखा विभाग
2) मु.ले.प. विभाग
3) संबंधित विभाग

2/- शिक्षु उमेदवारांना आपले नियंत्रणाखालील विभागामध्ये सविस्तर नेमणूका देऊन त्याबाबतचा अहवाल सादर करावा. नियुक्त शिक्षु उमेदवारांचे प्रशिक्षण कालावधीत त्यांना तांत्रिक कामाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची कामे देण्यात येऊ नये. प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत प्रशिक्षणार्थींना दिलेल्या विद्यावेतनाबाबतची प्रत्येक महिन्याप्रमाणे स्वतंत्र हजेरी व विद्यावेतन जमा केल्याच्या पुराव्यार्थ बँक पासबुकच्या छायांकित प्रतिसह दर 3 महिन्यांला एकत्रित सादर करावी. तसेच विनापरवाना गैरहजर राहणा-या उमेदवारांना आपले अधिकारात नोटीस बजावून खुलासा मागवून त्यासह अहवाल प्रशासन विभागास पाठवावा. उमेदवाराच्या गैरहजेरीत पत्रव्यवहारासंबंधित त्यांचा पत्ता किंवा भ्रमणध्वनीचा वापर करून सतत गैरहजर असणा-या उमेदवारांना तशी विचारणा करण्यात येऊन प्रशिक्षणासाठी इच्छुक नसल्यास तसा अहवाल इकडील कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावा. तसेच सदरच्या उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच त्यांना त्वरीत कार्यमुक्त करावे, कोणत्याही परिस्थितीत मुदत संपताच प्रशिक्षणकरिता त्यांना कामावर ठेवू नये.

4) मा.सहाय्यक संचालक, शिक्षु प्रशिक्षण मंडळ,
एटीआय कॅम्पस,व्ही.एन.पुरव मार्ग,
सायन, मुंबई – 22.

प्रशासन अधिकारी - 2
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 411 018.